# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३५**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ७२, रूपये:- १३,९८,५०,००,०००/-**<br>**श्रीमती जयश्री जाधव** |
| (१) | ६०२५ | १० | कोल्हापूर शहराची लोकसंख्या जास्त असल्यामुळे त्याप्रमाणात भाजी मंडई यांची संख्या अपुरी असल्यामुळे सर्वसामान्य शेतकरी,भाजीपाला उत्पादक व व्यवसायीक यांची गैरसोय होत असणे,त्यामुळे परिणामी शहरातील नागरीकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत असणे, तसेच कोल्हापूर शहरामध्ये सध्या असलेल्या भाजी मार्केट ची दुरुस्ती झालेली असणे, त्यामुळे स्थानिक प्रशासन यांनी कोल्हापूर शहरातील सद्यस्थितीत असलेल्या भाजी मंडया यांचे तातडीने नूतनीकरण किंव्हा सुशोभिकरणं करणे अत्यंत गरजेचे असणे,तसेच या शिवाय शहरात ठिकठिकाणी नवीन भाजी मंडई उभारणे आवश्यक असणे, तसेच ग्रामीण भागातील अनेक गोर गरीब शेतकऱ्यांचे पोट हे भाजी पाला विक्रीवर अवलंबून असणे, त्या मुळे भाजीपाला विक्रेत्यांना रोजगार व उत्पन्नाचे साधन यातून निर्माण होत असणे, त्यामुळे स्थानिक प्रशासनाने या भाजीपाला विक्री व्यवसाय करणाऱ्या व्यापारी वर्गाला दिलासा देण्यासाठी कोल्हापूर शहरात ठिकठिकाणी व गर्दीच्या नागरी वस्त्यांमध्ये सुसज्ज अशा भाजी मंडई उभाराव्या अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी कोल्हापूर यांनी समंधीत प्रशासनाकडे केकेली असणे , तसेच कोल्हापूर शहराला ठिकठिकाणी नवीन भाजी मंडई उभारण्यासाठी आवश्यक उपययोजना महानगर पालिका प्रशासन यांनी करायाव्यात व शहर वासियांना चागल्या प्रतीचा ताजा भाजीपाला मिळावा अशी मागणी सामान्य जनतेतून ही अनेकदा करण्यात आली होती असेही निदर्शनास आले असणे, परंतु कोल्हापूर शहरातील जुन्या भाजी मंडई चे नूतनीकरण किंव्हा शहरात ठिकठिकाणी नवीन भाजी मंडई उभारण्यासाठी कोणतीही कारवाई स्थानिक प्रशासन यांच्या वतीने झाली नसल्याचे ही निदर्शनास आले असणे, परिणामी कोल्हापूर शहरातील सामान्य जनमानसात स्थानिक प्रशासन व शासन यांच्या विरोधात तीव्र संतापाची भावना पसरली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ६०२९ | १० | “कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदार संघातील कोल्हापूर शहरातील शाहू मिल येथे प्रस्तावित छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मरणार्थ उभारण्यात येणारे “शाहू स्मारक विकास आराखडा” या कामास तत्कालीन कॉंग्रेस आघाडी सरकारने मंजुरी दिलेली होती. परंतु नंतरच्या कालखंडात राज्यात सतातंतर झाल्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात सदर मंजूर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आराखड्यास गती मिळाली नाही. ज्यागतिक ख्याती असलेल्या लोकराजा, छत्रपती शाहू महाराज यांचे यथोचित स्मारक त्यांच्याच जन्मभूमीत कोल्हापूर येथे प्रस्तावित "शाहू स्मारक विकास आराखडा" यास राज्य शासनाने 1000 कोटी रुपयाचा निधी देऊन सदर स्मारक तातडीने पूर्ण करणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ६०३२ | १० | " कोल्हापूर शहर हे देशातील ऐतिहासिक शहर असून जागतिक कीर्तीचे राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांची कर्मभूमि म्हणून ओळख असून करवीर निवासिनी अंबाबाई चे जागृत देवस्थान आहे. त्यामुळे जगभरातून भाविक, भक्त व पर्यटक येत असतात. परंतु सदर शहरामध्ये महिलांकरीता स्वतंत्र स्वच्छता गृह उपलब्ध नसल्याने महिला, स्थानिक महिला, भाविक व पर्यटक यांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शासनाने कोल्हापूर शहरामध्ये ठिकठिकाणी महिलांकरीत स्वतंत्र सुमारे 300 अद्यावत असे स्वच्छता गृहे उभारणीसाठी नगर विकास विभागाने अर्थ संकल्पांत ठोस निधीची तरतूद करून सदर निधी कोल्हापूर महानगरपलिका प्रशासन यांना तातडीने देणे बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (४) | ५९८२ | १० | मुंबईमध्ये अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, सदर इमारतींना दुरुस्तीची किंवा पुनर्विकासाची गरज असणे, यामध्ये सर्वात जास्त इमारती दक्षिण मुंबईत असणे, अश्या धोकादायक इमारतीमध्ये रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन रहात असणे, मुंबईत यावर्षी उशिरा पावसाळा सुरु होणे, पावसामुळे मुंबईमध्ये घडणाऱ्या दुर्घटनांना सुरुवात होणे, मुंबईमध्ये विविध ठिकाणी इमारतीचा भाग किंवा इमारतीची बाल्कनी कोसळण्याच्या दुर्घटना घडणे, या दुर्घटनांमध्ये झालेले मृत्यू अतिशय गंभीर बाब असणे, पहिल्याच पावसात सलग झालेल्या दुर्घटनांमुळे नागरीकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येणे, परिणामी सामान्य नागरीकांमध्ये असलेले भीतीचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ७४, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (५) | ५९६० | १० | जिल्हा बुलढाणा येथील मलकापुर व नादुरा या दोन्ही नगर परिषदांच्या जागेवर आठवडी बाजार बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत वारंवार निवेदने देण्यात आली आहेत परंतु कुठलीच कार्यवाही करण्यात आली नाही, तरी मलकापुर व नादुरा या दोन्ही नगर परिषदांना आठवडी बाजार बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. राजेश एकडे,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (६) | ५९६३ | १० | बुलढाणा जिल्हयातील मलकापुर व नंादुरा या दोन्ही नगर परिषदेच्या जागे मध्ये मुस्लिम समजाकरिता वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून शादीखाना मंजूर करणेबाबत वारंवार निवेदने देऊन सुद्धा निधीची तरतूद करण्यात आलेली नाही तरी त्या करिता निधी मंजूर करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. शिरीष चौधरी** |
| (७) | ६०३८ | १० | जळगाव जिल्ह्यातील यावल तालुका येथील नगर परिषद अंतर्गत येणाऱ्या अनेक वादांमध्ये रस्त्यांची मागणी झालेली असते नगर विकास विभागाकडे सातत्याने रस्त्यांची मागणी करून अध्यात्मिकी उपलब्ध न होणे व यासंदर्भात जिल्हा नियोजन याकडे करत असलेले दुर्लक्ष पाहता यावरती अधिकाऱ्यांच्या होणाऱ्या मनमानी बाबत व सातत्याने कामांची मागणी करून निधी ची तरतुद न करून न देणे या संदर्भात शासनाने 1) वार्ड नं. २ मधील मुस्लीम कब्रस्थानला संरक्षण भिंत बांधकाम करणे. 2)मौले पटेल कब्रस्थान मध्ये रस्ता काँक्रीटीकरण करणे. 3) सातोद रोडवरील डांगपूरा कब्रस्थानला संरक्षण भिंतीचे या कामांना निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (८) | ६००७ | १० | आषाढी कार्तिकी पायीवारी वेळी लाखो भाविक येत असतात. सदरच्या भाविकांना मुलभुत अत्यावश्यक सोई-सोविधा पुरविण्याची मोठी जबाबदारी ही नगरपरिषदेवर असते. नगरपरिषदेस दररोज नागरीकांच्या आरोग्यासाठी व साथीचे आजार फैलावू नये म्हणून स्वच्छता, फवारणी करीता मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करावी लागते असणे, सासवड नगरपरिषद हि ‘क -वर्ग’ दर्जाची व उत्पन्नाचे अर्थिक स्त्रोत कमी आहेत. त्यामुळे येणाऱ्या भाविकांना व नागरिकांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविताना नगरपरिषदेवर ताण येत असल्याने सासवड नगरपरिषदेस संत सोपानदेव तिर्थस्थान व इतर ऐतिहासिक, धार्मिक ठिकाणी येणाऱ्या भाविक व पर्यटकांना किमान आवश्यक सोयी सुविधा पुरविण्यासाठी देहू, आळंदी, पंढरपूरप्रमाणे यात्रा अनुदान देणे आवश्यक असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ६०१० | १० | पुणे जिल्ह्यातील सासवड नगरपरीषद “क-वर्ग” नगरपरीषद असल्याने यांच्याकडे उत्पन्नाचे स्त्रोत नाही. सदर नगरपरिषदा ह्या ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक परंपरा असलेले विकसनशील शहर असून सासवड हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून नागरीकांना मुलभुत सोयी-सुविधा देण्यामध्ये महाराष्ट्रात अग्रेसर नगरपरीषद असून स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्येही नगरपरिषदेनेही उच्चतम कामगिरी केल्याने संदर्भीय शासन निर्णयानुसार एकूण १५ कोटी रकमेची बक्षीस मंजूर झालेले होते. त्यापैकी ७.५० कोटी मिळालेले असून उर्वरित प्रोत्साहनात्मक अनुदान अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नसणे, शासनाने वेळोवेळी शासन निर्णय काढून विशीष्टपूर्ण व ठोक अनुदान मंजूर केलेले असून प्रत्येक्षात मात्र निधी वितरीत होणे गरजेचे असूनही अद्याप याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ६०१७ | १० | श्री क्षेत्र जेजुरी खंडोबा देवस्थान हे अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत असल्याने जेजुरी शहरामध्ये दर्शनासाठी दररोज असंख्य भाविक येतात तसेच वर्षभरात अनेक लहान मोठ्या यात्रा होत असून लाखो भाविक येत असून सदरच्या भाविकांना मुलभुत अत्यावश्यक सोई-सोविधा पुरविण्याची मोठी जबाबदारी ही नगरपरिषदेवर असून जेजुरी नगरपरिषद हि ‘क-वर्ग’ दर्जाची व उत्पन्नाचे अर्थिक स्त्रोत कमी असल्याने जेजुरी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शहरातील भाविकांना व नागरिकांना आवश्यक त्या सोई सुविधा पुरविताना नगरपरिषदेवर ताण येत असल्याने सन २०१९ ते २०२३ यात्रा कर अनुदान ७५००००००/- मिळाणे अपेक्षित होते परंतु शासना कडून १,४३,६६,०७१/- इतकीच रक्कम मिळालेली असून ६,०६,३३,९२९/- इतकी रक्कम येणे बाकी असणे, या काळात सर्व यात्रा भरलेल्या होत्या त्यामुळे रक्कम न आल्यामुळे भाविकांना सेवा व सुविधा उपलब्ध करताना नगरपालिकेला मर्यादा येत असून यासाठी शासन निर्णय काढून विशीष्टपूर्ण व ठोक अनुदान मंजूर केलेले असून प्रत्येक्षात मात्र निधी वितरीत होणे गरजेचे असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ६०२१ | १० | पुणे महानगरपालिकेत सामाविष्ट झालेल्या गावात वाढत्या नागरीकरणामुळे सहकारी गृहरचना संस्था(हौसिंग सोसायटी) यामध्ये वाढ झालेले असून महानगरपालिकेकडून १००% कर आकरले जाते परंतु सोयीसुविधा अपुऱ्या दिले जात असल्याची भावना या गृहरचना संस्थेच्या निवासी नागरीकांच्या मनात निर्माण झालेली असून मनपा हद्दीतील हौसिंग सोसायट्यामध्ये १ किंवा ३ दिवसाआड कमी दाबाने फक्त ३० ते ५० मिनीटे पाणी महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा केला जात असल्याने येथील नागरीकांना टॅकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत असणे, त्यामुळे नागरीकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याने सर्वत्र रोषाचे वातावरण निर्माण झाल्याने या गावांना सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी निधी मिळण्याबाबत शसनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ६०२२ | १० | पुणे महानगरपालिका हद्दीतील जांभुळवाडी तलावामध्ये दुषित-दुर्गंधीत पाणी सोडले जात असल्याबाबत. माझ्या कार्यक्षेत्रातील मौजे-जांभुळवाडी येथील जांभुळवाडी तलावामध्ये दुषित-दुर्गंधीत पाणी सोडल्याने येथील जैवविविधेस धोका निर्माण झालेले असून या पाण्यामुळे येथील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रवींद्र धंगेकर** |
| (१३) | ५९१८ | १० | पुणे महापालिकेने वाहनतळ, उद्यान क्षेत्रीय कार्यालये अशा मोक्याच्या ८२ ठिकाणी खासगी ठेकेदारांकडून ई-कार चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहे. सदरहू जागा ठेकेदारांना मोफत वापरण्यास देण्यात आलेली आहे, परंतू वाहनधारकांडकून मात्र तब्बल २२ रुपये प्रति युनिट इतका दर आकारला जाणार आहे . पुणेकरांना सदरहू सेवा परवडणारी नाही त्यामुळे त्यांनी तर ठेकेदाराला जागा मोफत देणार असाल तर ई-कार वाहन धारकांना चार्जिंग दरामध्ये सुट अथवा सवलत देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ५९१९ | १० | पुणे येथील वैंकुठ स्मशानभूमीतील वायुप्रदुषणाने या परिसरातील गृहनिर्माण सोसायटयांना नाहक त्रास सहन करावा लागते या स्मशानभुमीमुळे वायुप्रदुषणाची समस्या त्वरीत दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१५) | ५९२२ | १० | मुंबई महापालिकेच्या धर्तीवर पुणे महानगरपालिकेच्या हददीतील 500 चौ.फुटांच्या असलेल्या “ निवासी “ हा मुख्य वापरकर्ता प्रवर्ग असलेल्या मालमत्तांना मालमत्ता कराच्या सर्व घटकातून सूट मिळण्याबाबत होत असलेली नागरिकांची मागणी, त्यानुसार स्थानिक लोकप्रतिनिधिंनी शासनाकडे पत्रव्यवहार केलेला आहे. यासंदर्भात तातडीने निर्णय घेऊन त्याअनुषगांने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (१६) | ५९८१ | १० | मुंबईमध्ये शहर व उपनगरास जोडणारे वाहतुकीचे विविध प्रकारचे उड्डाणपूल असणे, मागील बऱ्याच वर्षांपासून हे उड्डाणपूल मुंबईचे सौंदर्य खुलवित असणे, कोट्यावधी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या या उड्डाणपुलाखालील मोकळ्या जागेचा लोकहितार्थ वापर होणे गरजेचे असणे, निवडक ठिकाणी उड्डाणपुलाखाली सुशोभिकरण करण्यात आलेले असणे, वाहतुकीचा महामार्ग असलेल्या या उड्डाणपुलाखाली जागांवर अवैध अतिक्रमण झालेले असणे, काही ठिकाणी असलेल्या अनधिकृत पार्किंगमुळे उड्डाणपुलाखालून रस्ता ओलांडणे सामान्य नागरीकांना अडचणीचे होणे, भिकारी, गर्दुल्ले यांसह समाजकंटाकांचा या उड्डाणपुलाखाली सर्रास वावर असणे, उड्डाणपुलाखाली भंगार सामान तसेच जुनाट वाहने अस्ताव्यस्त विखुरलेली असणे, अनेक ठिकाणी उड्डाणपुलाखाली झाडेझुडपे वाढलेली असणे, उड्डाणपुलाखालील मोकळ्या जागेचा सुनियोजित वापर व्हावा अशी सामान्य मुंबईकरांची भावना असणे, परिणामी सामान्य मुंबईकर नागरीकांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ५९८४ | १० | मुंबईमध्ये आजमितीस हिंदू व इतर धर्मियांच्या खासगी व महापालिका मिळून २०१ स्मशानभूमी व दफनभूमी असणे, अंत्यसंस्काराच्या ठिकाणी प्राथमिक स्वरूपाच्या आवश्यक सुविधा पुरविणे गरजेचे असणे, अनेक ठिकाणी अत्याधुनिक सोयीसुविधांनी पूर्ण अश्या स्मशानभूमी असणे, काही ठिकाणी विद्युत दहन वाहिनीची व्यवस्था असणे, परंतू तेथे स्थानिकांची गैरसोय होण्याच्या घटना वारंवार घडत असणे, स्मशानभूमी त्याचप्रमाणे दफनभूमी येथे स्वच्छता, बसण्याच्या जागा, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी यांची नीट देखभाल घेतली न जाणे, काही ठिकाणी दफनविधीसाठी जागा अपुरी पडणे, अनेक ठिकाणी तर स्मशानभूमी अथवा दफनभूमीकडे जाताना अनेक समस्यांचा सामना नागरीकांना करावा लागणे, स्मशानभूमी अथवा दफनभूमी परिसराची योग्य ती देखभाल करण्याबाबत आरोग्य विभाग उदासीन असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी स्मशानभूमी अथवा दफनभूमीमध्ये मृताच्या अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरीकांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना यामुळे सफाई कामगारांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ५९९१ | १० | मुंबईमध्ये शेकडो किमीच्या भूमिगत मलवाहिन्या असणे, त्यांच्या सफाईसाठी मॅनहोलमध्ये माणसे उतरवली जाणे, मॅनहोलमधील विषारी वायुमुळे अनेक कंत्राटी कर्मचारी मृत्युमुखी पडणे, काही कर्मचाऱ्यांना श्वसनाचे जीवघेणे विकार जडणे, भूमिगत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | गटारात उतरून हाताने मैला साफ करण्यास बंदी असणे, मुंबई महापालिकेकडे आधुनिक व स्मार्ट तंत्रज्ञानावर आधारित यंत्रसामग्री उपलब्ध असताना देखील आजही सफाई कामगारांना मॅनहोलच्या घाणीत माणूस उतरवून भूमिगत गटारांची सफाई करण्यात येणे, भूमिगत गटारांमध्ये सफाई करताना गोवंडीमध्ये दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू होणे, कांदिवली येथे भूमिगत गटारातून सफाई करून बाहेर येताना कामगाराच्या अंगावरून गाडी जाणे, आतापर्यंत ४१ जणांचा भूमिगत गटारात पडून मृत्यू होणे, सफाई कामगाराच्या सुरक्षेसाठी कोणतीही प्रणाली किंवा साहित्य देण्यात न येणे, यामुळे सफाई कामगारांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१९) | ५९८९ | १० | भंडारा जिल्हयात साकोली नगर परिषदेला स्वतंत्र प्रशासकीय ईमारत नसणे, नगरपरिषद साकोली व नगरपंचायत लाखनी व लाखांदूर शहरातील कव्हरसहीत गटा-यांचे बांधकाम नसणे, शहरात स्वतंत्र पाणी पुरवठा योजना नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२०) | ५९२४ | १० | मुंबई मालाड पश्चिम , मालवणी, चारकोप नाला येथील चारकोप नाल्यातील गाळ पूर्ण काढलेला नसणे, चारकोप नाला ते रियान इंटरनॅशनल स्कूल पर्यतच्या नाल्यातील गाळ म.न.पा कडून प्रत्येक वर्षी काढण्यात येत असणे, मात्र गाळ पूर्ण काढला जात नसणे, त्याच प्रमाणे रियान इंटरनॅशनल स्कूल ते महानगर पालिकेचे मालाड मलनि:सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्रापर्यत वर्षानुवर्षे गाळ काढला जात असणे, गाळ न काढल्यामुळे त्याठिकाणी मोठया प्रमाणावर नाल्यात गाळ साचला जात असणे, त्यामुळे दुर्गंधी निर्माण झाली असणे, परिणाम स्वरुप पर्यावरण व स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असणे, फुफुसांचे आजार होत असणे, खोकला व साथीच्या रोगांचे आजार होत असणे, याकडे म.न.पा चे संबंधित अधिकारी म.न.पा स गाळ काढल्याचे दाखवत असणे, मात्र प्रत्यक्षात गाळ काढला जात नसणे, संबंधित अधिका-यांची विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, संबधित अधिका-यांवर कामात कुचराई व दिरंगाई केल्या प्रकरणी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाश्यांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ५९२५ | १० | अंबोजवाडी, मालवणी, मालाड (पश्चिम), मुंबई येथील जमिनीचा सर्वे क्रमांक 263 (भाग) सी.टी.एस नंबर 3554 (भाग) असून सदरच्या जागेवर शासनाने दफनभूमीचे आरक्षण ठेवले असणे, त्या जागेवर सुन्नी व शिया मुस्लिम दफनभूमी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक रहिवाशांनी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, पालिका आयुक्त व प्रमुख अभियंता (डी.पी) बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे वारंवार केली असणे, तरीही शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशांत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | निर्माण झालेला तीव्र असंतोष व शास्त्राप्रती निर्माण झालेली चिडीची भावना दफनभूमी करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२२) | ५९२६ | १० | मुंबई उपनगरातील मालाड पश्चिम, रियान इंटरनॅशनल स्कूल ते इन्फिनिटी मॉल (Back Road), एव्हरशाईन नगर, डीपी रस्त्याचा विकास करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, सदरच्या डीपी रोडची स्थानिक नागरिकांनी वारंवार मागणी केली असणे, त्याचप्रमाणे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली असणे, शासनाने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ५९२७ | १० | ”मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई येथे महानगरपालिकेचे मलनिस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्तावित असून सन 1983 पासून सदरचा प्रकल्प प्रलंबित असणे, मालवणी येथील सर्वे नंबर 263 (पै.) रुपये सी.टी.एस नंबर 2841 (पै.)मधील सुमारे 83.62 हेक्टर क्षेत्रफळाचा भूखंड मनपाच्या ताब्यात असून त्यापैकी फक्त 35 हेक्टर जागेवर मलनिस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सदर जमिनीचा ताबा मालकी हक्कासाठी सन 1994 साली सुमारे 69,86,640/- एवढ्या रकमेचा भरणा जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्याकडे केला असणे, मलनिस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्रात क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे सुमारे 400 एम.एल.डी सांडपाणी मालाड खाडीत सोडण्यात येत असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जलप्रदूषण निर्माण होऊन जलचर प्राणी मृत्युमुखी पडत असणे, त्यामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम झाला असणे, परिणामी स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून पर्यावरणाचा समतोल बिघडला असणे, पर्यावरणाचा धोका टाळण्यासाठी मालाड मलनिस्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र तातडीने कार्यान्वित करणे आवश्यक असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशा निर्माण झालेला तीव्र संतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ५९३० | १० | मालवणी चर्च (मार्वे रोड मालाड पश्चिम मुंबई) परिसरात बरेच विनियोजित रस्ते असणे, मार्वे रोडच्या दक्षिणेकडील सहा 6.00 मी. रुंदीचे अंतर्गत रस्ते असणे, आकाशवाणी मधून 35.26 मीटर रुंदीचा विनियोजन रस्ता असणे, मालवणी चर्च जवळ 9.15 मी.रुंदीचा रस्ता असणे या सर्व रस्त्यांचा विकास करण्याची आवश्यकता असणे रस्त्यांचे रुंदीकरण करणे गरजेचे असणे, पी/उत्तर मनपा विभागातील, मालवणी चर्च परिसरातील व W/S-47 या विकास आराखड्यानुसार सर्व रस्ते दर्शविले असणे, जागेवर अस्तित्वात असलेले विनियोजित रस्ते तातडीने अधिग्रहित करणे, रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी जमिन अधिगृहीत करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, त्याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष प्ररिणामी स्थानिक नागरिकांना निर्माण झालेला तीव्र असंतोष त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | ५९३१ | १० | इन्फिनिटी मॉल (Back Road) ते लगून रोड मालाड पश्चिम मुंबई येथे असून सदरचा रस्ता जोडण्यासाठी त्या ठिकाणी पूल बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, पुलाचे क्षेत्र 0.99 हेक्टर कांदळवन बाधित व 198 मँग्रोज बाधित असणे पूल कांदळवन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | क्षेत्र व सीआरझेड बाधित असणे सीआरझेड व वन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता निर्माण झाली असणे, शासनाने ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी मे. टंडन अर्बन सुलोशन प्रा.लि या सल्लागार कंपनीचे नियुक्ती केली असणे सदरच्या कंपनीने त्याकडे दुर्लक्ष केले असणे, परिणाम स्वरूप सीआरझेड व वन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळाले नसणे, त्यामुळे पुलाचे काम सुरू करता आले नसणे परिणामी स्थानिक नागरिकांची गैरसोय होत असणे स्थानिकांना लांबून यावे व जावे लागत असणे परिणाम स्वरूप स्थानिक नागरिकांत जनतेत निर्माण झालेला तीव्र संतोष व शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना ना हरकत प्रमाणपत्र व पुलाचे काम तातडीने सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना . |
| (२६) | ५९३२ | १० | मालवणी मालाड पश्चिम मुंबई येथील लगून रोड ते अब्दुल हमीद मार्ग (D.P. Road) या रस्त्याचे 18.30 मीटर रुंदीकरणाचे काम करण्याची आवश्यकता असणे व ती काळाची गरज असणे,महानगरपालिकेने सर्वे केला असणे, तसेच सीमांकन केले असणे, रुंदीकरणाच्या कामात 43 बांधकामे बाधित झाली असणे, बाधितांच्या कागदपत्रांची पडताळणी व पात्रता निश्चित केली नसणे, बाधितांची पात्रता निश्चित करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, परिणामी स्थानिकांची पर्यायी व्यवस्था झाली नसणे, बाधितांना तातडीने पुनर्वसन करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | ५९३३ | १० | मार्वे रोड ते माय होम सॉप जवळ राधाकृष हॉटेल समोर, जनकल्याण नगर, मालाड (पश्चिम) मुंबई या रस्त्याचा विकास झाला नसणे, रस्त्याच्या विकासाचे काम अपूर्ण झाले असणे, त्यामुळे प्रचंड वाहतुक कोंडी निर्माण होत असणे, विकास करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ७६, रूपये:- ४,००,००,००,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (२८) | ५९१७ | १० | ”जळगांव जिल्हयातील फैजपूर नगरपरिषद वैशिष्टपुर्ण कामांना सन २०२१-२०२२ साठी रु. ३ कोटी ३० लाख रुपयांना निधी मंजूर करण्यात आलेला असून त्यांचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असणे, परंतू या कामांना अडचणी निर्माण येणार असल्याचे कारण देऊन फैजपूर नगरपरिषदेसाठी मंजूर कामे रद्द करुन मुक्ताईनगर नगरपरिषदेच्या कामांना मंजुरी देण्यात येणे, फैजपूर नगरपरिषदेच्या मंजूर कामावर खर्च न झाल्याने सदरची कामे संस्थगित करण्यात येणे, परिणामी फैजपूर नगरपालिकेतील स्थानिक नागरिकांत पसरलेली तीव्र असंतोषाची व अन्य होत असल्याची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (२९) | ६०११ | १० | सासवड नगरपरिषद, सासवड शहराची सन २०११ चे जनगणनेनुसार लोकसंख्या ३१८२१ इतकी आहे. सासवड शहरासाठी नगरपरिषदे मार्फत पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर रक्कम रु ८० कोटी इतका प्रस्ताव तयार करुन मंजुरीस्तव सादर करणेत आलेला असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत तांत्रिक तपासणीचे काम प्रगतीत असून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत समावेश करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३०) | ६०१४ | १० | जेजुरी नगरपरिषद, जेजुरी शहराची सन २०११ चे जनगणनेनुसार लोकसंख्या १४५१५ इतकी आहे. जेजुरी शहरासाठी नगरपरिषदे मार्फत पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर रक्कम रू १२५ कोटी इतका प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करणेत आलेला असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत तांत्रिक तपासणीचे काम प्रगतीत असून सदर प्रस्तावाचा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत समावेश करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३१) | ६०१५ | १० | जेजुरी नगरपरिषद, जेजुरी शहराची सन २०११ चे जनगणनेनुसार लोकसंख्या १४५१५ इतकी आहे. जेजुरी शहरासाठी नगरपरिषदे मार्फत पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन मंजुरीस्तव सादर करणेत आलेला आहे. तरी जेजुरी नगरपरिषद पाणी पुरवठा योजनेचा समावेश केंद्र व राज्य शासन पुरुस्कृत अमृत २.० या अभियानांतर्गत होणे अत्यंत गरजेचे असून जेजूरी नगरपरिषद पाणी पुरवठा योजनेचा समावेश केंद्र व राज्य शासन पुरुस्कृत अमृत २.० या अभियानांतर्गत समावेश करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाने करावववयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (३२) | ५९७६ | १० | जत नगरपरिषद लोकसंख्या 45 हजार असून येथील पाणीपुरवठा योजना अमृत 2.0 ही सदर प्रशासकीय मान्यते करिता नगरविकास विभ्ज्ञागामध्ये दि.309.2023 पासून प्रस्ताव दिला असून नगरपरिषद अंतर्गत लोकसंख्येचा विचारार्थ लक्षात घेता ही योजना खुप महत्वाची असून लोकांना पाणी विषय हा गंभीर असून दुष्काळी तालुका असल्या कारणाने पिण्याचे पाण्याचा विषय मार्गी लागल्यास गैरसोय दूर करण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ८२, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**श्री. बळवंत वानखडे,श्री. राजेश एकडे** |
| (३३) | ५९१३ | १० | नगर परिषद दर्यापूर जि. अमरावती येथील शासन अधिसूचनेनुसार शासन निर्णय क्रमांक एम.यु.एन. २०१७/प्र.क्र. १७७/नवी-१८ दिनांक २१ जून २०२१ नुसार हद्दवाढ झालेली असणे, यात प्रामुख्याने दर्यापूर शहरालगत असलेल्या, गायवाडी ,पेठ जहानपूर, पेठ इतबारपूर, लोधीपुर, गणेशपूर, शिवर , लेहेंगाव या ग्रामपंचायतीच्या बहुतांश भाग नगर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | परिषद दर्यापूर मध्ये समाविष्ट झालेला असणे, पूर्वी ग्रामपंचायतीमध्ये असलेला ,साईनगर ,सैनिक कॉलनी, समता नगर, मेहर नगर,अवधुत नगर, ड्रिम लॅड सिटी, पंजाबराव कॉलनी , संत गाडगेबाबा शिक्षक कॉलनी व अन्य परिसरात मोठ्या प्रमाणात मूलभूत सुविधांचा अभाव असणे, पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात या भागात सांडपानी वितरणाची व्यवस्था नसल्याने पावसाचे पाणी तसेच सांडपाणी मोठ्या प्रमाणात साचलेले असणे . यामुळे सरपटणाऱ्या प्राण्यांचा धोखा निर्माण झालेला असणे, तसेच रोगराई पसरण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, या भागातील नागरिकांमार्फत वेळोवेळी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणेबाबत मागण्या करण्यात येणे तसेच वेळोवेळी आंदोलन करण्यात येणे, हद्दवाढ झालेल्या भागात मूलभूत सुविधा पुरवण्याबाबत २५ कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फ़त मा. मंत्री नगरविकास यांना लेखी पत्रव्यहार केलेला असणे, परंतु अद्यापही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, यामुळे या भागातील नागरीकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (३४) | ५९५६ | १० | दर्यापूर विधानसभा मतदार संघातील दर्यापुर व अंजनगाव सुर्जी या नगरपरिषदांना नगरविकास विभागाच्या विविध योजनेअंतर्गत विकासकामांना १) शासन निर्णय क्र. रस्ताअ- २०२२/प्र.क्र. २८ (१२) नवि-१६ दिनांक २५ मार्च २०२२ , २) शासन निर्णय क्र. रस्ताअ- २०२२/प्र.क्र. २८ (१३) नवि-१६ दिनांक २५ मार्च २०२२ ,३) शासन निर्णय क्र. नपावै २०२२/प्र.क्र. ९८ (०९) नवि-१६ दिनांक १० जून २०२२, ४) शासन निर्णय क्र. रस्ताअ- २०२२/प्र.क्र. ९८ ब (०९) नवि-१६ दिनांक १० जून २०२२, ५) शासन निर्णय क्र. रस्ताअ- २०२२/प्र.क्र. ९८ ब (०९अ) नवि-१६ दिनांक १० जून २०२२ ,६) शासन शुध्दीपत्रक क्र. रस्ताअ- २०२२/प्र.क्र. २८ (१२) नवि-१६ दिनांक १० जुन २०२२ च्या शासन निर्णयानुसार निधी वितरणासह प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली असणे, पंरतु सर्व प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांना स्थगिती देण्यात आलेली असणे, सदर दोन्ही नगरपरिषद क्षेत्रातील मंजूर कामे होणे अत्यंत आवश्यक असून सदर कामे निवीदा प्रकीयेत असणे , सदर स्थगीती आदेश रद्द करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास लेखी पत्राद्वारे कळविले असणे, तसेच स्थगीती आदेश रद्द न झाल्याने उच्च न्यायालयात या प्रकरणाबाबत केस दाखल केलेली असणे, सदर प्रकरणात उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठामार्फत शासनाने मान्य केलेला निधी रद्द करू नये असे आदेशीत असणे, परंतु शासनामार्फत सदर कामे अद्यापही स्थगित केलेले असणे, यामुळे न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान झालेला असणे, सदर कामांवरील स्थगिती हटवण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (३५) | ६००४ | १० | जत नरपरिषद ही तालुकाच्या ठिकाणी असून नगरपरिष्द इमारत ही कमी जागे मध्ये कार्यरत असून नगरपरिषद मधील काही विभाग हे इतरत्र हलवण्याची अनेकदा वेळ आली असून नविन प्रशासकीय इमारतीसाठी सर्वे नं.510/2/ब/1 मधील 2585 चौ.मी.जागा मागणीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. सदर जागा हस्तांतर करण्यासाठी सुमारे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | 44 लाख रुपये विना मोबदला देण्यात यावा व आजरोजी नगरपरिषदेमध्ये आकृतीबंध नुसार संवर्गातील 16 पदे मंजूर करण्याकरीता व जागे करीता ठोस तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २१ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई